# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक ०४.०५.२०२६ सोमवार**

## नागपुर शहर पोलीस आयुक्तालय वतीने, चिमूकल्या पोलीस पाल्यांसाठी समर कॅम्पचे आयोजन :—

डॉ. श्री. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपुर शहर यांचे संकल्पनेतुन, नागपुर शहर पोलीस आयुक्तालय मार्फतीने पोलीस अधिकारी व अंमदार यांची मुले—मुली तसेच, सर्वसामान्य नागरीकांचे पाल्यांसाठी दिनांक ०४.०५.२०२६ ते दिनांक २२.०५.२०२६ दरम्यान, पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन टाकळी, नागपुर येथील चिमणीघर येथे समर कॅम्पचे आयोजन करण्यात आलेले आहे. समर कॅम्पची १) ४ ते ७ वर्षे २) ८ ते १४ वर्षे अशा दोन वर्गीय वयोगटामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. समर कॅम्पमध्ये मुलांसाठी इनडोअर तसेच, आऊटडोअर ज्यामध्ये प्रामुख्याने क्रिडा स्पर्धा, नृत्य, कला, हस्तकला, साहशी खेळ, मॉकड्रिल, प्रथमोपचार प्रशिक्षण, पोलीस ठाणे व ट्रॉफीक पार्क भेटी तसेच, पोलीस अधिकारी व अंमलदार सोबत सुसंवाद अशा प्रकारचे वेगवेगळ्या उपक्रमांचा समावेश आहे. समर कॅम्पचा मुख्य उद्देश मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, टिमवर्क तसेच, सामाजिक जाणिव याविषयी सकारात्मकता व सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करून, मुलांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. या समर कॅम्पकरीता विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद देत सहभाग घेतला.










(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे खापरखेडा :— पोलीस असल्याची बतावणी करून, फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०४.०५.२०२६ चे ०८.१५ वा. चे सुमारास, फिर्यादी हिरामण लोडकुजी पाटील, वय ६३ वर्षे, रा. शिवकृपा नगर, प्लॉट क्र. ५५, भिलगाव, तह. कामठी, जि. नागपूर हे त्यांचे मोटर सायकल क्र. एम.एच. ४० ए.व्हि. ००४७ ने पोलीस ठाणे खापरखेडा हद्‌दीत, वारेगाव शिवारातील त्यांचे शेताकडे जात असता, वारेगाव चौकात दुध घेण्याकरीता थांबले. फिर्यादी दुध घेत असता, त्यांचे जवळ एका काळ्या रंगाच्या मोटर सायकलवरून दोन अनोळखी ईसमांनी येवून, फिर्यादी यांना म्हटले की, ''साहेब तुम्हाला बराच वेळेपासून थांबविण्यास हाक मारत आहे. परंतु तुम्ही थांबले नाही. आम्ही पोलीस आहोत, या ठिकाणी कशाला आले, त्यावर फिर्यादीने दुध घेत आहे, म्हटले असता, तुम्ही दुध घ्या'' असे बोलून तेथून निघून गेले. फिर्यादी हे वारेगाव चौकातून आपले शेताकडे जात असता, वेळ ०८.३० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान, सुरादेवी रोड, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हॉस्टेल जवळ, वारेगाव येथे फिर्यादीस आधी भेटलेल्या त्याच ईसमांनी येवून फिर्यादीस थांबविले व ''तुम्ही सोन्याचे दागीने घालून का फिरत आहात, चोऱ्या खूप होत आहेत. तुमचे सोन्याचे दागीने काढून गाडीचे डिक्कीमध्ये ठेवा'' असे म्हटलेवरून, फिर्यादीने त्यांचे अंगावरचे सोन्याचे ०२ गोफ वजनी ५० ग्रॅम, सोन्याच्या ०३ अंगठ्या वजनी ३७ ग्रॅम असा एकुण किंमती ४,३५,०००/—रू. चा मुद्‌देमाल काढून थैलीमध्ये ठेवून डिक्कीत ठेवत असता, त्या अनोळखी ईसमांनी फिर्यादीस म्हटले की, ''डिक्कीत ठेवण्याआधी आम्हांला चौकशी करू दया, त्यानंतर डिक्कीत ठेवा'' असे बोलून त्यांनी फिर्यादी जवळील सोन्याचे दागीने घेवून एका पांढऱ्या कागदात गुंडळून, चोळा—बोळा करून डिक्कीत ठेवले व ते त्यांच्या काळ्या रंगाच्या मोटरसायकलने तेथून निघून गेले. त्यानंतर फिर्यादी आपले शेतात गेल्यावर त्यांनी डिक्कीतील सोन्याचे दागीने बघीतले असता, फिर्यादीचे सोन्याचे दागीने नसून डुप्लीकेट दागीने असल्याचे दिसून आले.

अशाप्रकारे फिर्यादी यांना आरोपींनी पोलीस असल्याची बतावणी करून, विश्वासात घेवून, फिर्यादी जवळील सोन्याचे ०२ गोफ व ०३ अंगठी असा एकुण ४,३५,०००/—रू. चा मुद्‌देमाल हातचलाखीने काढून घेवून, त्याऐवजी खोटे दागीने ठेवून, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून, फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. विलास कोरंगामी यांनी अनोळखी दोन्ही आरोपींविरूध्द कलम २०४, ३१८(४), भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०३.०५.२०२६ चे ०८.०० वा. चे पुर्वी, फिर्यादीचे पती नामे विलास ज्ञानेश्वर मून, वय ६० वर्षे, रा. वार्ड क्र. ०४ गुमगाव, तह. हिंगणा, नागपूर हे त्यांचे मित्र नामे आशिष मांडवेकर यांचे दुचाकी क्र. एम.एच. ३१ ई.डब्लु. ३३४६ ने डबलसिट कामावर पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, अमरावती—जबलपूर महामार्गाने, वृंदावनसिटी कडून एनसीआय हॉस्पीटलकडे जात असता, वृंदावन सिटी कटींगजवळ एका भारत बेन्झ कंपनीची डॉल्फीन ट्रॅव्हल्स क्र. एम.पी. ४१ झेड.ए. ००८१ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅव्हल्स भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादी हे मागे बसून जात असलेल्या मोटरसायकलला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील फिर्यादीचे पतीचे डोक्याला व हाताला तसेच, आशिष मांडवेकर यांचे डोक्याला, खांद्याला व हाता—पायाला मार लागल्याने गंभीर जखमी झाले. दोन्ही गंभीर जखमी यांना

उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे पती नामे विलास ज्ञानेश्वर मून यांना तपासुन मृत घोषीत केले. जखमी नामे आशिष मांडवेकर यांचा उपचार सुरू आहे.

यापकरणी फिर्यादी श्रीमती शिला विलास मुन, वय ४९ वर्षे, रा. रा. वार्ड क्र.०४ गुमगाव, तह. हिंगणा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा. कैलास चव्हाण यांनी ट्रॅव्हल्स चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६(१), १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे वाठोडा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०५.२०२६ चे १५.०० वा. ते दिनांक ०३.०५.२०२६ चे १५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, प्लॉट क्र. १९७, अंबा नगर, जैन मंदीर जवळ, दिघोरी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी जोगेंद्र रमेशराव मेटांगळे, वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून, परिवारासह त्यांचे मुळ गावी नरखेड येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख २५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,०५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. स्वप्नील राऊत ७६६६३११९०८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस. क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४००५४ /१९९० | कलम ३८१, ३४ भा.दं.वि. | सुरेशसिंग किसनसिंग ठाकुर, रा. पेंशन नगर, भागवत सहाय पांडेचे घरी किरायाने गिट्टीखदान, नागपूर. | ०५.०५.२०२६ |
| २. | मा. १७ वे सह दिवाणी न्यायाधिश तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३११२/२० २१ | कलम ३९२, ३४ भा.दं.वि. | करण फुलसिंग चौव्हान, रा. भुषन माहुले यांचे घरी किरायाने ८५ प्लॉट मागे, रामेश्वरी अजनी, नागपूर. | ०६.०५.२०२६ |
| ३. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०१३० /२००२ | कलम ४२०, ३४ भा.दं.वि. | एम.एन. रामलू श्रीनिवास, रा. श्री नायडू, ३०६, मोहन नगर, बॅक इंडीया मागे, नागपूर. | ०७.०५.२०२६ |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०३०१ /२००० | कलम ३९४, ३४ भा.दं.वि. | अव्या उर्फ अविनाश किसन शेंद्रे रा. गिरीपेठ पोस्ट ऑफीसचे बाजूला, शासकीय निवास, नागपूर. | ०७.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ०२, नागपुर. | ३०४०२८० /२००२ | कलम ३२५ भा.दं.वि. | करूणाकरण जगदिशप्रसाद त्रिपाठी, रा. १४०, रामदास पेठ, मोहश्वरी हाऊस येथे किरायाने सिताबर्डी, नागपूर. | ०७.०५.२०२६ |

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे कोराडी</u> :—** सौ. लक्ष्मी मुजेनदास सुर्यवंशी, वय २९ वर्षे, रा. संभाजी नगर, महादुला, कोराडी, नागपूर ह्या दिनांक २८.०४.२०२६ चे १३.३० वा. सोबत मुलगी नामे कु. मनस्वी मुजेनदास सुर्यवंशी, वय अडीच वर्षे हिचेसह पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>लक्ष्मी वर्णन</u>** —रंग— गोरा, चेहरा— लांबट बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— सलवार कुर्ता घतलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. **<u>मनस्वी वर्णन</u>**— रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, केस— काळे.

**<u>२) पोलीस ठाणे ईमामवाडा</u> :—** कु. प्राची सतीष बैस्वारे, वय १९ वर्षे, रा. इंदीरानगर, जाटतरोडी, नागपूर ही दिनांक २८.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतुन, राहते घरी नातेवाईकाकडे जाते असे सांगून निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— जिन्स पॅन्ट व टि—शर्ट घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलते.

**<u>३) पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** हर्ष कैलास धार्मिक, वय २० वर्षे, रा. नवीन मंगळवारी, पोळा मैदान, नागपूर हा दिनांक ०१.०५.२०२६ चे १०.०० वा. पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला. नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे, भाषा—हिंदी बोलतो.


लक्ष्मी


मनस्वी


प्राची


हर्ष

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**